# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-18.06.2026** **वार-गुरुवार**

---

**विधान परिषद-मुंबई**

राज्यात विधानपरिषदेच्या पुणे, ठाणे, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, यवतमाळ, वर्धा-गडचिरोली-चंद्रपूर आणि अहिल्यानगर या सहा जागांवर महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. उर्वरित 11 जागांसाठी आज मतदान होत आहे. यात सोलापूर, जळगाव, सांगली-सातारा, नांदेड, भंडारा-गोंदिया, नाशिक, अमरावती, धाराशिव-लातूर-बीड, परभणी-हिंगोली आणि छत्रपती संभाजीनगर-जालना या मतदारसंघांचा समावेश आहे. नागपूर मतदारसंघातल्या पोटनिवडणुकीसाठीही आज मतदान होत आहे. सकाळी आठ वाजता मतदानाला सुरुवात झाली असून सर्व मतदारसंघांमधे मतदानाची प्रक्रिया शांततेत सुरू आहे. विधानपरिषद निवडणुकीसाठीची मतमोजणी 22 जूनला होणार असून त्याच दिवशी निकाल जाहीर केला जाईल.

**विकसित भारत रोजगार**

पंतप्रधान विकसित भारत रोजगार योजनेंतर्गत 2 हजार 400 कोटी रुपयांच्या प्रोत्साहन निधीचं वितरण उद्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. देशभरात 200 ठिकाणी, प्रामुख्यानं औद्योगिक आणि रोजगार केंद्र असलेल्या भागात हा कार्यक्रम होणार आहे. पुण्यातील चार ठिकाणांचा त्यात समावेश असून मुख्य राष्ट्रीय कार्यक्रमाचं थेट प्रक्षेपण यावेळी केलं जाईल. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेच्या पुणे विभागानं आज ही माहिती दिली आहे. प्रथमच नोकरीवर रुजू होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी प्रोत्साहन देणं आणि संबंधित कर्मचाऱ्यांना रोजगार देणाऱ्या औद्योगिक संस्थांनाही प्रोत्साहनपर अनुदान देणं, अशा दोन भागात ही योजना राबवली जाणार आहे.

**आंतरराष्ट्रीय परिषद**

विकसित भारताच्या उभारणीसाठी तरुणांनी संशोधक वृत्ती जोपासत आधुनिक तंत्रज्ञान अवगत करावं, असं प्रतिपादन रायपूर ट्रिपल आयटीचे माजी कुलगुरू डॉ. पी. के. सिन्हा यांनी काल पुण्यात केलं. येवलेवाडी इथल्या केजे एज्युकेशनल इन्स्टिट्यूट्सनं आयोजित केलेल्या 'इग्नाईट 2026' या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन सत्रात ते बोलत होते. विकसित भारताच्या निर्मितीसाठी शिक्षण व्यवस्थेतही पूरक बदल आवश्यक आहेत; त्यासाठी 'इग्नाईट' यांसारख्या परिषदांमधून पाठबळ मिळेल, असं सिन्हा म्हणाले.

**आदर्श गाव**

प्रधानमंत्री आदर्श ग्राम योजनेमध्ये राज्यातल्या 28 जिल्ह्यांमधील 741 गावांची केंद्र शासनाने निवड केली आहे. या गावांमध्ये येत्या 23 ते 25 जून या कालावधीत विशेष ग्रामसभा आणि आदर्श गावांची संयुक्त पडताळणी मोहीम राबवण्यात येणार आहे. या मोहिमेमध्ये, सर्व ग्रामस्थ, ग्रामपंचायत पदाधिकारी, कर्मचारी, स्वयंसेवी संस्था, बचत गट प्रतिनिधी यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावं असं आवाहन समाज कल्याण आयुक्त दीपा मुधोळ-मुंडे यांनी केलं आहे.

**राणी लक्ष्मीबाई**

झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज त्यांना आदरांजली वाहण्यात येत आहे. पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, उपमहापौर परशुराम वाडेकर, कऱ्हाडे ब्राह्म संघाचे अध्यक्ष अमित शहाणे यांनी बालगंधर्व रंगमंदिर चौकातल्या राणी लक्ष्मीबाई यांच्या अश्वारूढ पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. यावेळी झाशीच्या राणी लक्ष्मीबाई यांच्या पराक्रमाचं वर्णन असलेली समुहगीतं सादर करण्यात आली.

**<u>रोजगार मेळावा</u>**

पुणे जिल्ह्यातल्या घोडेगाव इथं येत्या 24 जून रोजी पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा भरवला जाणार आहे. पुणे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि घोडेगाव इथल्या शासकीय औद्योगिक संस्थेने याचं आयोजन केलं आहे. आंबेगाव तालुक्यातील 10 उद्योजक यात सहभागी होतील आणि 300 हून अधिक रिक्त पदांसाठी भरती प्रक्रिया राबवली जाणार आहे. इच्छुक उमेदवारांनी rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करावी, असं आवाहन जिल्हा रोजगार आणि उद्योजकता मार्गदर्शन केंद्रानं केलं आहे.

**<u>पु.ल.स्मृती महोत्सव</u>**

'आशय सांस्कृतिक' आणि 'पु. ल. परिवारा'च्या सहयोगाने होणारा यंदाचा पु. ल. स्मृती महोत्सव येत्या 24 आणि 25 जून रोजी पुण्यात आयोजित केला जाणार आहे. यंदाचा 'पु. ल. स्मृती सन्मान' प्रख्यात कथक नृत्यांगना पंडिता शमा भाटे यांना प्रदान करण्यात येईल, अशी माहिती महोत्सवाच्या आयोजकांनी निवेदनाद्वारे दिली आहे. राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाच्या सभागृहात दोनही दिवस संध्याकाळी 5 ते 8 यावेळेत हा महोत्सव होणार आहे.

**<u>गुण गौरव</u>**

यश मिळवण्यासाठी मोठी स्वप्ने, सातत्यपूर्ण परिश्रम आणि आत्मविश्वास आवश्यक आहे असं प्रतिपादन व्यवसायक्षमता प्रशिक्षक आणि उद्योजक अविनाश देशमुख यांनी केलं आहे. पुण्यातील माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी विद्यालयात आयोजित गुणगौरव समारंभात ते आज बोलत होते.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज कमाल 36 तर किमान 24 पूर्णांक 2 दशांश अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. उद्या कमाल तापमानात आणखी थोडी वाढ अपेक्षित आहे, तसंच दुपारनंतर आकाश अंशतः ढगाळ राहण्याचीही शक्यता आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू, विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांत मध्ये. नमस्कार.**